भारताचा सतत नारा मंत्र जपावा शांती दुताचा ।
परि बळी कां व्हावे तुम्ही या हत्येचा ।।१ ।।
असा कसा उजाडला तो बुध गुरू शुक्र शनिवार ।
साऱ्या भारतात घरोघरी झाला तो हाहाःकार ।।२ ।।
पोलिस अधिकारी निरपराध जनतेचे जातात बळी ।
भारत का गप्प बसतो तो वेळोवेळी ।।३ ।।
नुसता निषेध नोंदवून प्रश्न का असा सुटेना ।
हवी त्या साठीं कडक शिक्षेची योजना ।।४ ।।
छत्रपती शिवाजी रेल्वे स्थानी झाला बेछूट गोळीबार ।
रोजी रोटी साठी बाहेर पडती निःशस्त्र ते काय गुन्हेगार ?।।५ ।।
युध्द भूमी केली ताजमहाल हॉटेल ओबेरॉय-नरीमन ।
निरपराध ओलीसांच्या हत्येने मने झाली विषण्ण ।।६ ।।
विध्द मन विषण्ण भावना, दुःख भरी संताप ।
अरे ! अतिरेक्यांनो भारतीयांचा काय गुन्हा कोणते पाप ।।७ ।।
शहिद कमांडो उन्नीकृष्णण पोलिस अधिकारी करकरे, कामटे, साळसकर ।
उघडी पडली पोलिस दले, त्यांची कुटुंबे झाली निराधार ।।८ ।।
कुणीही म्हणावे व्यर्थ न हो बलिदान ।
परि इथे दुष्टांना ते खरे वरदान ।।९ ।।
मनि भिती दाटते काळ येईल, काळ जाईल ।
परि हे बलिदान व्यर्थच राहील ।।१० ।।
त्रिवार वंदन व्ही. टी. च्या हातगाडी हमालांना त्या देवदूतांना ।
हात गाडी वरून हलवले सेंट जॉर्जेस मध्ये १७५ अत्यवस्थांना ।।११ ।।
साठ तासांची अतिरेक्यांशी झुंज-लढाई ।
मृत्यु समोर उभा साक्ष देते गनिमी काव्याची ढिलाई ।।१२ ।।
अतिरेक्यांनी काय साधले देशी-परदेशींना मारून ।
ही तर हत्या निर्दयी निर्घृणांतली निर्घृण ।।१३ ।।
आज हवे होते स्वातंत्र्यवीर सावरकर, सुभाषबाबू, शास्त्री, लोकमान्य टिळक ।
मग निश्चित लागला असता भारत मातेस सुराज्याचा कुमकूमतिलक ।।१४ ।।
चिरशांती लाभो शहिदांच्या आत्म्यासी ।
मम हिच प्रार्थना असे ती भगवंताशी ।।१५ ।।
हृदयी दाटल्या अश्रूंची ओंजळी ।
वाहते मी ही मनःपूर्वक श्रध्दांजली ।।१६ ।।

**सौ. उर्मिला प्र. भुतकर**

बी. एस. एन. एल. चे सध्याचे पेन्शनर्स म्हणजे पूर्वीचे डी. ओ. टी. चे कर्मचारी साहजिकच एकाच घरातील दोन भावंना समान न्याय मिळाला पाहीजे ही भावना. सहावे पे कमिशन १.१.२००६ पासून लागू झाले. कर्मचाऱ्यांच्या वेतनात जशी वाढझाली तशीच निवृत्तांची/फॅमिली पेन्शन धारकांची पेन्शन पण वाढली. १ जानेवारी २००६ पासून च्या थकबाकीचा पहिला हफ्ता सुध्दा मिळाला.

आम्ही जर पूर्वीच्या डी.ओ.टी.चे आहोत तर त्यांच्या प्रमाणे ५० टक्के डी.ए.मर्जर आणि ६ व्या पे कमिशनचे फायदे आम्हाला का नाहीत ? असे प्रश्न बी.एस.एन.एल. च्या निवृत्तांचे मनात येणे स्वाभाविक आहे. त्याचप्रमाणे मेडिकल अलौन्स देतांना सर्व निवृत्तांना फॅमिली पेन्शन धारकांना द्यावयास हवेत. इथे सुध्दा बी.एस.एन.एल. ने भेदभाव केला आहे.

बी.एस.एन.एल. च्या कर्मचाऱ्यांसाठी वेज-बोर्ड स्थापन करण्यात आली. त्यांनी पे कमिशन प्रमाणे नविन वेतन श्रेणी दिल्या. आता त्यावर आधारित तरी निवृत्तांना फायदा मिळणार का ?

बी.एस.एन.एल. मध्ये समाविष्ठ होण्याचा ऑप्शन (पर्याय) आम्ही दिला. सरकारी निवृत्तांना मिळणारे सर्व फायदे आम्हालाही दिले जातील, असे आश्वासन तर त्यावेळी दिले होते. पण आता परिस्थिती निराळीच अनुभवाला येत आहे. बी.एस.एन.एल. निवृत्तांना काही जास्तीचे फायदे जरूर मिळाले, पण ते चालू राहणार का ! अशी भिती या निवृत्तांच्या मनात सदैव असते. त्यावर मार्ग एकच.

सर्व बी.एस.एन.एल. निवृत्तांनी एकत्र आले पाहिजे. आपले प्रश्न लोक प्रतिनिधीच्या मार्फत शासनासमोर मांडले पाहिजेत. परंतू होते काय, तर पेन्शन मिळते आहे त्यामुळे एका संतुष्ट समाधानी माणसाप्रमाणे हे निवृत्त निष्क्रिय झाले आहेत. तसे होता कामा नये. निवृत्तांपैकी बी.एस.एन.एल. चे पेन्शनर्स संख्येने कमी आहेत, त्यांचे अनेक प्रश्न आहेत व नविन निर्माण होणार

**श्रीपाद देशपांडे**